‘दुरचित्रवाणीवरील मराठी मालिकातील स्त्री भूमिकेच्या सामाजिक प्रभावाचे समाजशास्त्रीय अध्ययन’—{संदर्भ नांदेड जिल्हा}

प्रस्तावना:(Introduction)

भारतामध्ये अनेक शाहयांचा उदय झालेला दिसुन येतो. या शाहयांनी भारतावर स्वत:च्या वेगळेपणाचे, अस्तित्वाचे ठसे उमटवत राज्य केले आणि अशाप्रकारे भारताचा इतिहास घडत गेला. अनेक राजे, त्यांची राज्ये, शाहया प्रत्येकांची विविध पध्दती, धर्म, प्रथा, परंपरा, ग्रंथसाहित्य, वास्तू, वस्त्या, कला अशा भागात विभागलेल्या भारतासारख्या देशामध्ये मनोरंजनासाठीही अनेक प्रकार या सर्वांमधुनच आलेले दिसुन येतात. मुघल सम्राटाच्या काळात संगीत, नृत्य, ललित कला, शिकार, ई. मनोरंजनाची साधने होती(दिक्षीत:२००५). संगीत, नृत्य, ललित कला ई. मनोरंजनाची कामे स्त्रिया करत.

याशिवाय मंदिरे, मकबरे, गड—किल्ले, लेण्या इ. वास्तूंमध्ये आढळणारी शिल्पकला, चित्रकला, ग्रामिण भागात मोठया प्रमाणात होणारे किर्तन, भजन, रामलिला, रामायण—महाभारतातील प्रसंग नाटकाद्वारे प्रस्तुत करणे, जत्रा, यात्रा, लोकसंस्कृती अशा विविध गोष्टी पूर्वी असणाऱ्या प्रसारमाध्यमांचे प्रकार होते, यास आपण अनौपचारिक प्रसारमाध्यमे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. कारण जेव्हा भारतामध्ये औपचारिक प्रसारमाध्यमांचा (Formal Media) उदय झाला नव्हता. तेंव्हा याच सर्व गोष्टी प्रसारमाध्यमांचे काम करीत असे, यातून समाजाचे मनोरंजन होई व याबद्दल माहितीही मिळत असे.

औपचारिक प्रसारमाध्यमांचा विकास हा साधारणत: तीन भागांमध्ये विकसित होत गेलेला दिसुन येतो.

१. पहिला टप्पा हा ब्रिटिश राजवटीचा होता. या प्रक्रियेत प्रसारमाध्यमांचे दोन भागांमध्ये विभाजन झाले होते. त्यापैकी एका भागात ब्रिटिश शासनांचे समर्थन केले जात होते. तर दुसऱ्या भागाने स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांची साथ दिली.याच काळात रेडियो प्रसारणाची सुरुवात झाली (कुमार,२०१०).
२. दुसरा टप्पा होता भारताच्या स्वातंत्र्य काळापासून ते ८० च्या दशकापर्यंतचा. मुद्रित मेडिया खाजगी हातात याच काळात गेला. रंगीत दूरदर्शनचे आगमन झाले.मालिकांचे आगमन झाले.रंगीन दूरदर्शनच्या किंमती कृष्णधवल संचापेक्षा अधिक असल्याने रंगीन संचाच्या विक्रिला उठाव नव्हता तसेच शासकीय यंत्रणेची या माध्यमांवर मक्तेदारी होती. दर्जेदार रंजनपर कार्यक्रमांची कमी

असल्यामुळेही लोक दूरदर्शन संच घेण्यास अधिक प्रवृत्त होत नव्हते. दूरदर्शन माध्यम लोकप्रिय ठरावं म्हणुन माध्यमाशी सबंधित माहिती व प्रसारखात्याने चित्रपट माध्यमातील काही स्वतंत्र निर्माता–दिग्दर्शकांना दूरदर्शनसाठी मालिका तयार करण्याची मुभा दिली व कार्यक्रम प्रायोजित करण्यासही परवानगी दिली. हमलोग, रामायण(१९८७) आणि महाभारत(१९८८) या मालिकांनी पूर्ण भारतभरातील जनमानसाला मंत्रमुग्ध केले.(कुलकर्णी,चंपानेरकर:२०१३) दूरदर्शन, डीडी–२ (डीडी–मेट्रो) या दोन्ही वाहिनींचे प्रसारण उपग्रहामार्फत होत होते.

३. या माध्यमाने आपल्या विकासाचा आणि बाजारीकरणाचा तिसरा टप्पा गाठला तो नव्वदच्या दशकात. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणास ९० च्या दशकात मान्यता देण्यात आल्या. काळात रेडियो व टेलिव्हिजन वरील शासानाची पकड सुटत गेली. खाजगी वाहिन्या ज्या २४ तास चाणाऱ्या होत्या व खाजगी रेडियो यांचा प्रसार झाला. चीन, तईवान सारख्या देशांसोबत भारत देखिल टेलिव्हिजनसाठी सर्वात महत्वाचे बाजरपेठ बनले(कुमार:२०१०)

मराठी वाहिनींचे आगमन :

मराठी भाषेचे दूरदर्शनवर आगमन झाले. दूरदर्शनवर शासनाचं नियंत्रण होते यावरच सुरुवातीस मराठी भाषेस अर्धा तास(तीस मिनीट) एवढा वेळ मिळत असते. या वेळामध्ये बातम्या व सिनेमे हेच करमणूकीचे साधन होते.(विकीपीडीया)

२ ऑक्टोबर १९७२ रोजी मराठी कार्यक्रमांना सुरुवात झाली जेंव्हा राज्य सरकारने दूरदर्शन वाहिनी शासनाच्या नियंत्रणात घेतली यावरही दोन तासच कार्यक्रम चालत. १५ ऑगस्ट १९९४ रोजी डीडी–सहयाद्री अशी संपूर्ण मराठी वाहिनीची निर्मिती झाली. डीडी–सहयाद्रीस सुरुवातीला 'आ.एल.एस.एस(RLSS) मराठी' असे म्हणत असत. (विकीपिडीया)

मराठी खाजगी वाहिन्यांचे आगमन :

झी मराठी ही वाहिनी झी नेटवर्कच्या माध्यमातून निर्माण झालेली प्रथम खाजगी मराठी वाहिनी आहे. १५ ऑगस्ट १९९९ रोजी 'झी नेटवर्क' ने 'अल्फा मराठी' नावाच्या वाहिनीची निर्मिती केली. ज्याचे नंतर 'झी मराठी' नावाने नामकरण करण्यात आले. याचकाळात इतर अनेक मराठी वाहिन्यांची सुरुवात झाली २००० मध्ये 'इ.टि.व्ही' ची 'इ. टि.व्ही मराठी', 'प्रभात टि.व्ही.', 'तारा मराठी' या वाहिन्यांची निर्मिती करण्यात आली. २००२ मध्ये 'प्रभात टिव्ही' व 'तारा मराठी' या वाहिन्या बंद करण्यात आल्या. यानंतर २००८ मध्ये स्टार टिव्हीने 'स्टार प्रवाह' हया वाहिनीची निर्मिती केली त्यानंतर फक्त

मराठी, मायबोली, झी युवा अशा नवनवीन मराठी वाहिन्या सुरु झालेल्या दिसुन येतात. या व्यतिरिक्त बातम्या, खेळ, संगीत, चित्रपट इ. वाहिन्यांचीही निर्मिती मराठी भाषेत झाली.

कौटुंबिक मालिका :

मराठी वाहिनीवर प्रसारण होणाऱ्या मालिका, कार्यक्रमामध्ये कौटुंबिक मालिकांचे प्रमाण फार मोठे आहे. दैनंदिन मालिका स्त्रियांना प्रेक्षक व मालिकेतील मुख्य नटी म्हणुन दोन्ही पद्धतीने लक्ष केंद्रित करतात. (इकॉनॉमिक आणि पॉलिटिकल विकली—एप्रिल २६—मे२,२००३)

स्त्रिया व माध्यम या विषयाच्या संदर्भात मोठया प्रमाणात अभ्यास, संशोधन झालेले आहे. कुटुंब, संपत्ती, शिक्षण, नोकऱ्या इ. इतर संस्थाप्रमाणे व भागांप्रमाणे माध्यमामधील लिंगभाव विषमतेचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. जाहिराती, सिनेमा, दूरदर्शनशी संबंधित कार्यालये, संस्था या मध्ये स्त्रियांना मिळणारे दुय्यम स्थान, दुय्यम भूमिका, स्त्रियांचे साचेबद्ध प्रतिरुपण (Stereotype Representation) आणि स्त्रियांचा सहभाग या विषयांवर या विषयाशी संबंधित अशा अनेक विषयांचा या अभ्यासात समावेश आहे.

'स्त्री' बद्दलचे मुळातच साचेबद्ध असणारे समाजाचे दृष्टिकोन स्त्रीस दृय्यम बनवत असतात. बुदर्यू यांनी 'डॉक्सा' ही संकल्पना मांडली. ज्यावर चर्चा केली जात नाही, त्यास नाव दिले जात नाही, कोणत्याही तर्काशिवाय जसे आहे तसे स्विकारले जाते, जे गृहित धरले जाते ते म्हणजे लिंगभावात्मक भूमिका, स्त्रियांची क्षमता व घटक(भागवत:२०११) स्त्रीने कोणतेही हक्क न मागता उलट जास्तीत जास्त त्याग करावा अशी अपेक्षा केली जाते. स्वत:चा विचार न करता, स्वत:च्या गरजांकडे न लक्ष देता फक्त कामे करावीत अशी अपेक्षा व्यक्त केली जाते, असे मधु किरवर त्यांच्या मानुषी पुस्तकातील त्यांच्या लेखात सांगतात (चव्हाण:२०१०)या प्रकारचे विविध दृष्टिकोन आहेत ज्यामध्ये स्त्रियांच्या भूमिकांविषयीची साचेबद्ध चौकट, लिंगभाव असमानता दिसुन येते. स्त्री कुटुंबाचे हितसबंध सांभाळणे ही तिची सर्वात पहिली बाब असली पाहिजे असे लाहानपणापासून तिच्यावर बिंबवले जाते.(चव्हाण:२०१०) म्हणजेच त्याग, स्वत:चा विचार न करणे, परोपकार सेवा, इ. गुण स्त्रीमध्ये असावेत. हे गुण असणारी स्त्री ही आदर्श आहे, असे मानन्यात येते. अगरवाल, बीना या माध्यमांर्फत सामाजिक आदर्शाच्या रचितांवर प्रतिगामी अथवा पुरोगामी पद्धतीने परिणाम करु शकतात हे मान्य करतात (भागवत:२०११)याच अनुषंगाने मराठी वाहिनी वरील मालिकांमध्ये स्त्रीचे (नायिकेचे) जे प्रतिरुपण होते. साधारणत: सर्वच मालिकांमध्ये नायिका 'आदर्शाच्या चौकटीत' भूमिका बजावताना दिसुनयेते. आणि माध्यमांच्या प्रभुत्वशाली नियंत्रण व त्याव्दारे होणाऱ्या

प्रतिरुपणाचे परिणाम तरुण व वृद्ध दोन्ही जनसमुदायावर होऊ शकतो (देशपांडे:२००९) म्हणजेच नायिकेचाप्रेक्षक वर्गाच्या स्त्री विषयक दृष्टिकोन, स्त्री दर्जा, अपेक्षा इत्यादीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

<u>विषय निवडीचे महत्व</u>:³Importance of Study´

'दुरचित्रवाणीवरील मराठी मालिकातील स्त्री भूमिकेच्या सामाजिक प्रभावाचे समाजशास्त्रीय अध्ययन'—{संदर्भ नांदेड जिल्हा} या संशोधन विषयामध्ये मराठी मालिकामध्ये प्रस्तुत केली जात असलेल्या स्त्रीचित्रणाची साचेबद्ध चौकट जाणून घेवून त्याचे समाजातील प्रतिबिंब कशा पद्धतीने प्रस्तुत होते, याबाबतच्या तथ्यांचा अभ्यास करण्यावर संशोधकाचा भर असणार आहे. साधारणपणे मालिकांमधील स्त्री चित्रणामार्फत साचेबद्ध चौकटीतील 'आदर्श स्त्रीचे' प्रतिरुपण (Representation)होत आहे. या प्रतिरुपणाचा समाजावर कशाप्रकारे व काय परिणाम होतो याबाबतची माहिती मिळण्यास प्रस्तुत शोधकार्य उपयुक्त ठरू शकते.समाज व प्रसारमाध्यमे यांचा संबंध घनिष्ट असतो.चित्रपट, विविध मालिका याद्वारे समाजमनाची दर्शन घडत असते. मालिकाद्वारे प्रस्तुत कौटुंबिक सबंध, पती—पत्नीतील नाते, भावनिक एकरूपता, सामाजिक व्यवहार, नात्यातील गुंतागुंतता आदि विविध समाजजीवनाशी निगडीत घटकांचा अभ्यास करण्यास संशोधनाचा उपयोग हाईल.तसेच प्रस्तुत संशोधन मिडीया, प्रसारमाध्यमे यांचा समाजावर अनुकूल—प्रतिकूल स्वरूपात पडणारा प्रभाव समजून येण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

<u>संशोधनाची उद्दिष्टये</u>:³Objectives of Research´

१. मराठी वाहिनीवर दाखवल्या जाणाऱ्या दैनंदिन कौटुंबिक मालिकांद्वारे स्त्रियांचे साचेबद्ध (Stereotype)पद्धतीने होणाऱ्या प्रतिरुपणाचा (Representation) अभ्यास करणे.

२. मराठी मालिकांतून प्रदर्शित होणाऱ्या स्त्रियांच्या साचेबद्ध भूमिकेचा समाजावरील प्रभावाचे अध्ययन करणे.

३. मराठी मालिकांमधील स्त्रीच्या प्रतिरुपणाद्वारे घडून येत असलेल्या सामाजिक आणि कौटुंबिक परिवर्तनाचे अध्ययन करणे.

४. मराठी मालिकाद्वारे प्रस्तुत स्त्री प्रतिरुपणाचा स्त्रियांच्या सामाजिकरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

५. स्त्रीच्या विविध वर्गातील प्रस्तुत भुमिकेचा अभ्यास करणे

<u>संशोधनाची गृहितकृत्ये</u>:³Hypothesis of Research´

१. मालिकांमधील नायिका ‘समाजाच्या’ दृष्टिने ‘आदर्श’ या साचेबद्ध चौकटीत वर्तन करते.
२. नायिकेच्या साचेबद्ध चौकटीतील भूमिकेचा स्त्री सामाजिकरणावर परिणाम होतो.
३. स्त्रीचा स्वत:कडे व समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असून, स्त्रीकडून स्त्री म्हणुन केल्या जाणाऱ्या अपेक्षा व प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष बंधनेवाढतात.
४. ‘आदर्श स्त्री’ भूमिकेचे चित्रण लिंगभाव असमानता दर्शविते.
५. प्रस्तूत मालिकांमधील नायिका समाजातील एका विशिष्ट समूहाचे, समूहाच्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात.

<u>पुर्व संशोधीत साहित्याचे परिक्षण</u>::[3]Review of Literature´

टुचमन, गये (१९७९)यांनी *‘वुमंन्स डेपिक्शन बाय द मास मेडिया’*या लेखामध्ये प्रसारमाध्यमांच्या जनतेवर होणारा परिणाम स्पष्ट केला आहे. ज्यामध्ये ते सांगतात की, प्रसारमाध्यमांचा हानिकारक प्रभाव व्यक्ती व समूहावर काही प्रमाणावर होत असतो. त्याचप्रमाणे प्रसारमाध्यमे स्त्रीचे प्रतिरुपण करत असताना पुरुषांची वरिष्ठता गृहित धरतात, तसेच दैनंदिन मालिका मध्ये स्त्रीपेक्षा पुरुष मोठया प्रमाणात वैयक्तिक गुंतागुंतीबद्दल उपदेश देताना दिसतात , याबद्दल ही त्यांनी लिहीले आहे. ऑरवन्ट आणि कॅन्टर यांच्या पत्रकारिताच्या विद्यार्थ्याच्या अभ्यासामध्ये त्यांना असे दिसुन आले की, स्त्रियांविषयी जी साचेबद्धता आहे ती पुरुषांप्रमाणे स्त्रियांमध्येही आढळते.

दासगुप्ता, संजुक्ता, सिन्हा, दिपांकर, चक्रवती, सुदेशना (२०१२)यांनी टेलिव्हिजनवर असणाऱ्या मालिकांचे निरिक्षण करुन स्त्रीच्या चित्रणाचे काही मुद्दे मांडले आहेत. चांगली व वाईट स्त्रीची भूमिका चौकटीबद्ध आहे. शांत राहणारी, सहन करणारी, जी बोलण्यापेक्षा जास्त रडत असते, अशी स्त्री चांगली स्त्री म्हणुन चित्रीत केली जाते. तसेच ही स्त्री मुलगी, पत्नी, सून, बहिण अशी भूमिका करते. स्त्री पुरुषापेक्षा दुय्यम भूमिका करते. उमा चक्रवर्ती यांनी रामायण महाभारत व इतर मालिकांमध्ये सासू—सून नात्यांचे चौकटीबद्ध प्रतिरुपण तसेच उच्च माध्यमिक वर्गाचे चौकटीबद्ध व श्रेणी प्रतिरुपण असते. ंयाबद्दल विचार मांडलेले दिसुन येतात तसेच टेलिव्हिजवरील मालिकांमधून दाग—दागिणे, वस्त्र टॅटू अशा विविध गोष्टीचे आकर्षण सर्व वयाच्या, विवाहित, अविवाहीत स्त्रियांमध्ये दिसुन येते आणि सर्व गोष्टींचे अनुकरणही करताना त्या दिसतात.

टुचमन,गये (१९७८)यांनी टेलिव्हिजनवर चालणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये स्त्रियांचा सहभाग याविषयीची टक्केवारी मांडली आहे. त्यांच्या या टक्केवारी नुसार (१९५४—१९७५) मालिकांमध्ये स्त्रियांचा सहभाग पुरुषांच्या तुलनेत अत्यंत कमी होता.

तसेच सहभाग असलेल्या स्त्रियांच्या भूमिका देखिल पुरुषापेक्षा कनिष्ट दर्जाच्या दाखविल्या जात. पुरुष व स्त्री एका व्यवसायामध्ये दाखवतात तसेच कौटुंबिक भूमिकेमधील स्त्री अधिकाधिक दर्शवितात.गये यांनी महत्वाचा मुद्दा यात मांडला आहे. त्यांच्या मते प्रसारमाध्यमे स्त्रियांचे जे चित्र दाखवतील ते चित्रण 'मॉडेल' म्हणुन ते पाहत असणाऱ्या लहान मुलीवर परिणाम करेल. मानसशास्त्रज्ञ मॉडेलची संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात की, मॉडेलिंग हे केवळ इतरांना पाहिल्यामुळे होते. त्यात कोणतीही प्रत्यक्ष शिकविण्याची किंवा रीत असण्याची गरज नसते. आता हे पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे की, मुल पाहून (By watching) आणि ऐकून शिकतात त्यासाठी तसे प्रत्यक्ष शिकविण्याची किंवा त्याप्रकारची रीत असण्याची गरज भासत नाही.

मुन्शी,शोम (२०१०)यांनी *'प्राईम टाईम सोप ओपेराज ऑन इंडियन टेलिव्हिजन'* या पुस्तकामध्ये हिंदी भाषेतील तिन मालिकांचा विविध अनुषगांने अभ्यास केलेला दिसुन येतो. यामध्ये नटी व कुटुबांतील इतर भूमिकांचे प्रतिरुपण त्यांच्या नावांचे मालिकेतील अर्थ, संदर्भ इ. अनेक विषयांना त्यांनी हाताळलेले दिसुन येते.स्त्रियांना कशाप्रकारे सितेच्या रुपात दर्शवून 'तूलसी','पार्वती' असे नावे देऊन, आदर्श दाखवतात. आदर्श स्त्री, आदर्श पत्नी, आदर्श सून असे स्त्री (नटीचे) प्रतिरुपण करत असतात. तसेच त्याग हा नटीचा सर्वात महत्वाचा गुण असतो हे दाखवतात हे मांडले आहे.याच प्रकारे खलनायिकेच्या भूमिकेतील स्त्रीचे प्रतिरुपण देखिल मुन्शी शोम यांनी स्पष्ट केले आहे. शोभा डे यांनी नटीच्या प्रतिरुपणातील सावळी नटी व गोरी नटी यांचे विश्लेषण केले आहे. सावळया नटीचे चित्रण होत असताना लगेचच ज्या पालकांची मुलगी आपल्या मुलीशी जोडतील, असे शोभा डे यांनी मांडले आहे. वाईट स्त्री दाखवल्याशिवाय चांगली स्त्री दिसणार नाही यासाठी स्त्रीच कशी प्रत्येकवेळी खलनायक रुपात दाखवतात याबद्दलही त्यांनी विचार मांडले आहेत.

पर्से, एलिझाबेथ (२००१)यांनी *'मेडिया इफेक्ट ॲन्ड सोसायटी'* या पुस्तकात प्रसारमाध्यमांमार्फत शिकण्याच्या विविध प्रकारांचे विवेचन केले आहे. तसेच प्रसारमाध्यमांचा सामाजिकरणावर होणारे परिणाम देखिल त्यांनी स्पष्ट केले आहे.स्त्रीचे प्रतिरुपण हे मोठया प्रमाणात चौकटीबद्ध दाखवतात. पुरुषांच्या तुलनेत जास्तीत जास्त वेळेस घरी, कुटुंबात दाखवतात. स्त्रीच्या प्रतिरुपणात कुटुंब व नोकरी यांचे मिश्रण नसते आणि काही वेळा जरी कुटुंब व नोकरी एकत्र दाखविले तरी तिचे घरामध्ये असण्याचे चित्रण जास्त प्रमाणात असते. वडिल किंवा मुले हेच केद्रस्थानी असतात. तसेच लहानमुलांवर कुटुंबानंतर टेलिव्हिजनवर होणाऱ्या चित्रिकरणाचा कशाप्रकारे परिणाम होतो व त्यांची मते कशाप्रकारे चौकटीबद्ध होतात हे अमेरिकेच्या लोकसंख्येबाबत एलिझाबेथ यांनी स्पष्ट केले आहे.

हायसम, लोऊ (१९९६)यांनी *'वूमेन ॲन्ड द मेडिया'*लेखात प्रसारमाध्यमे काही पुरुषांच्या हातात आहे असे सांगितले आहे. प्रसारमाध्यमे माहितीचे शक्तीशाली स्त्रोत आहेत. तसेच संस्कृती जपणे, नवीन कल्पना व मतांना नवे आकार देण्याचे देखिल स्त्रोत आहे असे लोऊ यांचे मत आहे.प्रसारमाध्यमांमार्फत आपण जे वाचतो, पाहतो आणि एकतो त्यातून संकुचित प्रतिरुपण होण्याची शक्यता असते व यामुळे स्त्रीचे नकारार्थी (व्यस्तचित्र) आणि असमान लिंगभाव साचेबद्धतेमध्ये भर घातली जाते.

लोऊ यांच्या मते, मेडियामध्ये असणाऱ्या पितृसत्ताक नातेसंबधाना आणि लिंगभाव असमानतेला आव्हान देण्याची गरज आहे. कारण, याचा गंभीर परिणाम आपल्या दर्जावर होतो. ज्याप्रमाणे समाजाकडून आपल्याला पाहिले जाते त्याचप्रमाणे आपण स्वत:कडे पाहतो.

अध्ययन क्षेत्र:³Area of Study´

संशोधन विषयाचे अध्ययन क्षेत्र म्हणुन नांदेड जिल्हयाची निवड करण्यात येणार आहे.विशेषत: नांदेड जिल्हयात असणारया १६ तालुक्यातील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थिती भिन्न आहे, याचा विचार करून शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही क्षेत्रातीलदुरचित्रवाणीवरील मराठी मालिकातील स्त्री चित्रणाच्या सामाजिक प्रभावाचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यात येणार आहे.

सैद्धांतिक दृष्टिकोन:³Theoritical Perspective´

ग्रामशी, ॲन्टोनियो(१९७१) *'सांस्कृतिक प्रभुत्व'* ही संकल्पना मांडली. ग्रामशीच्या मते, अधिसत्ता म्हणजे प्रभुत्वशाली वर्ग हा त्याचे प्रभुत्व कायम करण्यासाठी किंवा राखण्यासाठी इतर वर्गाचे विघटन करुन अथवा त्यातील काही गटांबरोबर आघाडया करुन किंवा तडजोडी करुन एक सहमती निर्माण करतो. यातुन त्याचे प्रभुत्व एका स्थिर सामाजिक व्यवस्थेतून कायम टिकून राहण्याची व्यवस्था करतो.ग्रामशी यांच्या लिखाणाचे विवेचन खालीलप्रमाणे आहे की, संपूर्ण समाजाच्या गुंतागुंतीच्या व्यावहारीक आणि सैद्धांतिक कृती सत्ताधारी वर्ग प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी करतो व ज्यांच्यावर सत्ता गाजवायची त्याची सहमती (consent) प्राप्त करतो.

ग्रामशीच्या मतानुसार सत्ताधारी वर्गाचे प्रभूत्व हे बळाचा वापर करुन मिळवली जात नाही तर ते लोकांना समजाऊन त्यांचे मतपरिवर्तन करुन त्यांना सत्ताधारी वर्गाच्या राजकीय व नैतिक मूल्यांचा स्विकार करायला लावल्याने साध्य होते. त्यांच्या मते, सत्ताधारी वर्गाचे नियंत्रण कायम राखण्यासाठी सत्ताधारी वर्ग नागरी समजामार्फत लोकांच्या मूल्ये व विश्वासावर प्रभुत्व निर्माण करत असतो.ग्रामशीच्या मते, संस्कृती ही दैनंदिन

आयुष्यामध्ये आपल्याला आपले जग नकारात्मक करणे, आपल्या कल्पना नकारात्मक आणि सकारात्मक, बरोबर आणि चूक, सुंदर आणि कुरुप, शक्य आणि अशक्य हे ठरविण्यासाठी मार्गदशन करत असते.

ग्रामशीच्या मते, संस्कृतीची सत्ता ही अदृश्य स्वरुपात असते. आपल्या दृष्टिकोनातून जे सोयीस्कर व सुंदर आहे ती म्हणजे संस्कृती व सत्ताधारी वर्ग अंकित वर्गाकडून सांस्कृतिक मूल्ये व धारणांमार्फत सहमती निर्माण करतो व अशाप्रकारे सत्तेत (उच्चजाती) असणाऱ्यांचे संस्कृतीचे प्रभुत्व निर्माण होते. ही संस्कृती राजकारण आहे. ती अनेक कथा, रुप, शब्दाकृती मध्ये गुंडाळलेली आहे. परंतू ती राजकारणासारखी दिसत नाही. जेंव्हा संस्कृती ही प्रभुत्वशाली बनते. तेंव्हा ती अधिकांश लोकसंख्येकरिता 'कॉमन सेन्स' बनते. उपरोक्त अध्ययन विषयाशी *सांस्कृतिक प्रभुत्वाची* संकल्पना जुळवून अध्ययन करण्याचा प्रयत्न असणार आहे.

मदन अणि मुजुमदार यांच्या मते, *'जात हा बंद वर्ग आहे.'*भारतीय समाजात 'जात' ताठर अशी संकल्पना आहे. जातीमध्ये श्रेणी आहेत व त्यातील उच्च जातींचे लोक समाजात श्रेष्ठ मानले जातात. हेच उच्च जातींचे लोक समाजात इतर ठिकाणी ही आपले वर्चस्व कायम ठेवत असतात. किंवा ग्रामशी यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांचे प्रभुत्व समाजातील इतर जातींवर असते.

संशोधनासाठी निवडलेल्या मालिकांमध्ये उच्च जातीयांची संस्कृती म्हणजेच सण—उत्सव, प्रथा,परंपरा,रीतीरिवाज इ. दाखवले जातात. ज्यांच्यामार्फत हे दाखवले जाते तो समूहही उच्च जातीय आहे. उच्च जातीय असल्याने त्यांची संस्कृती ही उच्च आहे. त्यांच्या संस्कृतीचे प्रभुत्व टिकवून ठेवण्याची ही कृती असल्याचे दिसुन येते. ग्रामशी यांच्या म्हणण्याप्रमाणे इतर जातींचे लोक या सांस्कृतिक प्रभुत्वाशी सहमत असतात.

उपरोक्त अध्ययन विषय **ऑगबर्नच्या** सामाजिक परिवर्तनाच्या सिद्धांताशी पडताळुन पाहण्यात येणार आहे. विविध मराठी मालिकांचा समाजमनावर होणारा परिणाम आणि त्यातून होणारे सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन अभ्यासण्यासाठी **डॉ. एम. एन. श्रीनिवास यांचा सांस्कृतिकीकरणाचा सिद्धांत**, तसेच साळुंखे, सर्जेराव (१९९६) यांच्या समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना या ग्रंथात त्यांनी **भूमिका संघर्ष** ही संकल्पना स्पष्ट केलेली आहे. भूमिका संघर्षाचे उदाहरण देत असताना त्यांनी एका स्त्री चे उदाहरण घेतले आहे. एखादी स्त्री नोकरीच्या ठिकाणी अधिकारी इ. आणि घरी पत्नी, आई, सून इ. भूमिका पार पाडत असते. तिच्या सर्व भूमिका त्या—त्या नात्यांसाठी महत्वपूर्ण असतात व त्याप्रमाणे तिच्याकडून अपेक्षाही केल्या जात असतात. परंतू अन्य भूमिकाविषयक उल्लंघन

केल्याखेरिज तिला यापैकी कोणतीही एक भूमिका चांगल्या रीतीने वठविणे अशक्य असते याच परिस्थितीला भूमिका संघर्ष असे म्हटले जाते ही संकल्पनाअभ्यासण्यात येईल.

काचेचे छत(Glass Ceiling) ही संकल्पना विषमता (Discrimination) दर्शविण्यासाठी मांडली गेलेली आहे. **फेडरल ग्लास सिलिंग कमिशनने** (१९९५) काचेच्या छताची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. स्त्री व अल्पसंख्यांकाच्या विकासामधील कृत्रीम अडथळे म्हणजे काचेचे छत होय व या अडथळयामधून विषमता परावर्तीत होते. साधारणत: काचेचे छत म्हणजे पारदर्शक छत जे स्त्रीला सत्तेच्या ठिकाणापासुन अथवा निर्णय घेण्याच्या स्थानापासून वंचित ठेवते, अडथळा निर्माण करते. याचे नेमके असे कारण सांगता येत नाही, तरीही प्रस्तुत विषय उपरोक्त सिद्धांताच्या चौकटीत ठेवून अभ्यासण्यात येईल.

नमुना निवड: (Sampling Method)

प्रस्तुत अभ्यासात नांदेड जिल्हयातीलझी मराठी वाहिनीवर प्रक्षेपित होणाऱ्या मालिका पाहणाऱ्या एकुण२०० महिलांचा समावेश होणार असून ‘गैर संभाव्यता नमुना निवड’ (Non-probability Sampling)या प्रकारातील ‘सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमुना निवड’(Purposive Sampling)या नमुना निवडीचा अवलंब करून अध्ययन करण्यात येणार आहे.

संशोधनाचा प्रकार आणि आराखडा: (Research Design)

प्रस्तूत संशोधन अध्ययनासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडयाद्वारे प्राथमिक तंत्राचा अवलंब करूनतथ्य संकलन करण्यात येईल. मराठी मालिकांमार्फत नायिकेच्या साचेबद्ध प्रतिरुपणाचे उत्तरदाते व त्यांच्याशी संबंधित स्त्रिया यांच्या सामाजिकरणावर होणारे परिणाम कशाप्रकारे होत आहेत? या प्रतिरुपणामुळे स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा बदलत आहे? स्त्रीकडुन लिंगभाव विषमता असणाऱ्या वर्तनाच्या अपेक्षा होत आहेत का? त्या अपेक्षा कोणत्या आहेत? अशा इतर घटनांची वास्तविकता शोधण्यासाठी अन्वेषणात्मक आराखडयाचा वापर केला जाणार आहे.

संशोधन मर्यादा: (Limitations of Study)

संशोधन ही दिर्घकालीन प्रक्रिया आहे. कोणत्याही विषयाचे संशोधन अल्प कालावधित सखोल व यशस्वीरित्या पूर्ण करणे शक्य नसते. याच अडचणीमुळे प्रस्तुत संशोधनामध्ये मोजक्या मुद्दयांवर भर देण्यात येईल.मालिकांविषयी माहिती संकलित करीत असताना मालिकांचा एकुण कालावधी कमी असल्याकारणामुळे संशोधनासाठी निवडलेल्या

मालिकांव्यतिरिक्त नव्या येणाऱ्या मालिकांचीही माहिती व तथ्यसंकलन उत्तरदात्यांकडुन होईल, याबाबतचा विचार संशोधकास करावा लागेल.प्रस्तूत विषयांशी संबंधित विषयांवर काही प्रमाणात साहित्य लेखन उपलब्ध आहे परंतु प्रस्तुत संबंधित विषयांच्या दृष्टिकोनाशी संबधित साहित्य लेखनाचा अभाव आहे.त्यामुळे द्वितीयक माहिती संकलनासाठी काही प्रमाणात मर्यादा पडण्याची शक्यता दिसुन येते.

तथ्य संकलन पद्धती: (Data Collection Method)

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात येईल.

प्राथमिक स्त्रोत:

प्रस्तुत संशोधनासाठी मुलाखत अनुसूची या तंत्राची निवड वस्तूनिष्ठ माहिती प्राप्त करण्यासाठी करण्यात येईल. मुलाखत अनुसूचीमध्ये वैयक्तिक माहिती, कौटुंबिक माहिती, आर्थिक माहिती, दैनंदिन कार्याबद्दल, दिनचर्येबद्दल माहीती तसेच विषया संदर्भातील विविध प्रश्नांचा समावेश करण्यात येईल. मुलाखत अनुसूची तयार करताना बंदिस्त व मुक्त अशा दोन्ही प्रश्नांचा समावेश करण्यात येईल. निरिक्षण, केंद्रित समूह चर्चा, सखोल मुलाखत व व्यष्टी अध्ययन या तंत्राचा अवलंब तथ्ये गोळा करण्यासाठी करण्यात येईल.

दुय्यम स्त्रोत :

तथ्य संकलनासाठी विविध पुस्तके, प्रकाशित लेख, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, टेलिव्हिजनवरील मालिका आणि त्याचबरोबर इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या निरनिराळया माहितींच्या स्त्रोतांचा वापर करुन अभ्यास विषयाच्या संदर्भातील तथ्ये संकलित करण्यात येतील.

तथ्य प्रक्रिया:

तथ्य प्रक्रिया या घटकामध्ये तथ्य संपादन, संस्करण, तथ्यांचे वर्गीकरण, संकेतीकरण करून तथ्य विश्लेषणाद्वारे संशोधक अंतिम निष्कर्षाकडे शोधकार्यात वाटचाल करणार आहे.

प्रकरणांची रचना:(Chapterization)

शोधप्रबंधाला पुढील प्रकरणामध्ये विभाजित करण्यात येतील.

प्रकरण पहिले: प्रस्तावना

प्रस्तावना या प्रकरणामध्ये संशोधन विषयांची ओळख करुन देण्यात येईल.

माध्यम, टेलिव्हिजन, दूरदर्शन, खाजगी वाहिन्या आणि झी टि.व्ही यांची निर्मिती व

विकास यांचा आढावा घेण्यातयेईल. वाहिनीवरील मालिका त्यामध्ये स्त्रीचे प्रतिरुपण आणि सामाजिक दृष्टिकोन याविषयी देखिल थोडक्यात चर्चा करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : पूर्व साहित्याचे अवलोकन व संशोधन पद्धती

प्रस्तूत संशोधनात संशोधन पद्धतीची मांडणी या प्रकरणात करण्यात येईल. यामध्ये सैद्धांतिक दृष्टिकोन, संशोधनाची उद्दिष्टये, गृहितकृत्ये, संशोधनाचे क्षेत्र, मर्यादा, नमुना निवड, संशोधनाचा आराखडा, तथ्य संकलनाची तंत्रे, पूर्व तपासणी (पायलट स्टडी), प्रकरण योजना यासांरख्या बाबींचा समावेश करण्यात येईल. तसेच या प्रकरणामध्ये संशोधन विषयाच्या संदर्भातील विविध संशोधक, अभ्यासक, विचारवंत व साहित्यिकांचे विचार, त्यांचे निष्कर्ष आणि या सर्व संबंधित साहित्यांचा आढावा घेतल्या नंतर प्रस्तूत संशोधन विषयाच्या अनूषंगाने चर्चा करण्यात येईल.

प्रकरण तिसरेः मराठी मालींकातील स्त्री चित्रण व समकालीन स्त्रीची भूमिका

त्याग, वात्सल्य, प्रेम, माया या गुणांनी स्त्री, कन्या, भगिनी, पत्नी, माता, सून म्हणून कशी वागणे अपेक्षित आहे. स्त्रीने कोणतेही हक्क न मागता उलट जास्तीत जास्त त्याग करावा अशी अपेक्षा केली जाते. स्वत:चा विचार न करता, स्वत:च्या गरजांकडे न लक्ष देता फक्त कामे करावीत अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. समाजाचे स्त्री दुय्यम समजून स्त्रीकडून ज्या काही जबाबदाऱ्या व कर्तव्यांची अपेक्षित वर्तने आहेत. ज्यामध्ये लिंगभाव असमानता प्रतिबिंबीत होते. त्यांचे तंतोतंत प्रतिरूपण नायिकेच्या भूमिकेतून स्त्री प्रेक्षक व इतर प्रेक्षकांपर्यंत दैनंदिन मालिकांमधून दररोज पोहचत आहे व याचा परिणाम स्त्री विषयक दृष्टिकोन, स्त्री दर्जा, अपेक्षा इत्यादीवर कशाप्रकारे होत आहेयाविषयी चर्चा या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण चौथेः स्त्री प्रतिरुपन–सामाजिकरण प्रक्रिया व स्त्रियांमधील सामाजिक–कौटुंबिक परिवर्तन

सामाजिकरणाचेविविध स्त्रोत आहेत. ज्यामध्ये माध्यमे हे महत्वाचे स्त्रोत आहेत. म्हणजेच माध्यमांमार्फत सामाजिकरण होत असते व व्यक्ती त्यातून घडत असते. या मालिकांमधुन स्त्रीचे जे प्रतिरुपन होते त्या मार्फत स्त्रियांमध्ये सामाजिक–कौटुंबिक परिवर्तन होते आहे त्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे: निष्कर्ष विवेचन

या प्रकरणामध्ये प्राप्त बाबी म्हणजे, विषया संबंधित असलेली सैद्धांतिक चौकट व विचारवंतांनी, संशोधकांनी मांडलेले विचार व उत्तरदात्यांकडून प्राप्त माहिती यावरुन निष्कर्ष मांडण्यात येतील. मालिकेच्या संदर्भात मांडलेली गृहितकृत्ये देखिल या प्रकरणात स्पष्ट केली जातील.तसेच प्रस्तुत प्रकरणात मुलाखत अनुसूचीद्वारे संकलित तथ्यांचे स्पष्टीकरण, निर्वचन व विवेचन करण्यात येईल.

प्रकरण सहावे: सूचना व शिफारशी

शोधप्रबंधाच्या विषयासंदर्भातील मार्गदर्शक सूचनांचाही समावेश या प्रकरणामध्ये करण्यात येईल. तसेच शिफारशी देखिल याच प्रकरणामध्ये समाविष्ट करण्यात येतील.

परिशिष्टे:(Index)

१.मुलाखत अनुसूची

२.छायाचित्रे

संदर्भ ग्रंथसूची: (Bibliography)

सोमण,मा. {१९८४}, '*सामाजिक संशोधनाची तंत्रे*', पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे.

आगलावे,प्रदिप {२०००}, '*संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे*', विद्या प्रकाशन, नागपुर.

डोईफोडे, ज्योती {२०१२}, '*समाजशास्त्रीय विचारप्रवाह*' विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

साळुखे, सर्जेराव {१९९६}, '*समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना*' प्रोफिशन्ट पब्लिशिंग हाऊस. पुणे.

दीक्षित, नी.सी. {२००५}, '*भारताचा इतिहास*', पिंपळापुरे अॅन्ड कं.पब्लिशर्स, नागपुर.

Munshi, Shoma (2010), '*Prime Time Soap Operas on Indian Television*, Routledge publication, Delhi.

Perse, M. Elizabeth (2001), '*Media Effect And Society'* Lawrence Erlbaum Associates Publishers, London.

Deshpande,Anirudh(2009),'Class,Power and Consciousness in Indian Cinema and Television',Primus Books,Delhi.

Dasgupta,Sanjukta and others (2012) ,'*Media,Gender & Popular Culture in India'*, Sage Publications, New Delhi.

Kumar ,Keval(2010), '*Mass Communication in India'*JAICO Publications,

Gramsci, A(1971) '*Selections From The Prison Notebooks'*(Edt & Translated by Hoare,Q.and Nowell-smith,G),Lawrence and Wishart.

Tuchman,Gaye(1978), '*The Symbolic Annihilation of Women by Mass Media'*, Rawat Publications, Jaipur.

Haysom,Lou(1996), '*Women and The Media'*, Taylor & Francis.Ltd.

संकेतस्थळ:

http://googleweblight.com/?Lite_url=http://hi.m.wikipedia.org/wiki//.25EO

http://www.india-forums.com/forum-posts.asp?TIT=438476&TPN=25

http://en.wikipedia.org/w/index.php?title=TelevisioninIndia&printable=yes

http://en.wikipedia.org/w/index.php?title=marathi_language_television&printable=yes

http://www.europarl.europa.eu/studies.

http://www.zeemarathi.com/zee-marathi-about-us.

http://www.media- awareness.ca/english/issues/stereotyping/women&girls.

http://www.jstore.org

संशोधक,

मोहिनी प्रकाश कनकदंडे
एम. फिल. नांदेड.

मार्गदर्शक,

डॉ बिभीषण करे
संशोधन मार्गदर्शक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.